१3

# महाराष्ट्र शासन

क्र.संकीर्ण-२०२०/कार्या-११ स
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
मंत्रालय, मुंबई -३२
दिनांक - १ एप्रिल, २०२०

कालमर्यादा

प्रति,

सभापती / प्रशासक,
सर्व कृषि उत्पन्न बाजार समित्या,
महाराष्ट्र राज्य.

विषय:-कोविड-१९ प्रादुर्भावामुळे कोरोना विषाणूचा प्रसार रोखण्यासाठी केलेल्या लॉकडाऊनच्या कालावधीत दुर्बल घटकातील गरीब व गरजू लोकांसाठी विविध उपक्रम राबविणेबाबत.

महोदय,

आपण सर्व जण अवगत आहात की, कोराना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी दि.२३.०३.२०२० च्या मध्यरात्रीपासून दि.१४.०४.२०२० पर्यत संपूर्ण देशात पूर्णत: लॉकडाऊन करण्यात आले असून, आपल्या राज्यात कलम १४४ नुसार दि.२२.०३.२०२० पासून संचारबंदीदेखील लागू करण्यात आली आहे.

२. या लॉकडाऊन व संचारबंदीमुळे रोज काम करुन आपली रोजची उपजिविका अर्जित करुन दोन वेळच्या जेवणाची व्यवस्था भागविणारे कामगार, ज्यांच्याकडे उत्पन्नाचे साधन नाही अशा लोकांची उपासमारी सुरु झालेली असून सर्व व्यावसायिक व औदयोगिक व कुटीर उदयोग बंद झाल्यामुळे त्यांची उत्पन्न शुन्यावर येऊन, रोजचे दोन्ही वेळचे अन्न मिळणे अवघड झाले आहे. तसेच आपल्या राज्यात रोजगारासाठी आलेले कामगार, लॉकडाऊन असूनही वेगवेगळया कारणेस्तव अनधिकृतपणे आपल्या गावी जाण्याच्या प्रयत्न करीत आहेत. मात्र केंद्र शासन व मा.सर्वोच्च न्यायालयाचे आदेशानुसार आपल्या गावी जाण्याचा प्रयत्न करीत असलेल्या लोकांना ते आहेत तेथेच थांबविण्यात आले असून जिल्हा प्रशासनाकडून त्यांच्यासाठी तात्पुरते निवाऱ्याची सोय करण्यात आलेली आहे.

Scanned by CamScanner

३. या कोरोना जीवघेण्या साथीमुळे निर्माण झालेल्या अभूतपूर्व परिस्थितीमुळे देशभरात आलेले दुर्बल घटकातील गोर गरीब व कामगार नागरिकांकरिता जेवणाची सोय करण्यासाठी सक्षम सहकारी संस्था म्हणून आपणास सुध्दा हातभार लावणे आवश्यक आहे. अशा नागरिकांचीदेखील दररोजच्या जेवणाची सोय करणे आवश्यक झाले आहे. त्यामुळे अशा गरजू नागरिकांकरिता जिल्हाधिकारी उप विभागीय अधिकारी तहसीलदार व सहाय्यक निबंधक यांचे मान्यतेने आपल्या स्वःनिधीतून बाजार समितीच्या आवारात किंवा जिल्हा प्रशासनाने केलेल्या निवा-याच्या ठिकाणी त्यांचे जेवणाची व्यवस्था करण्यात यावी. याशिवाय गरजू लोकांना अन्नधान्य उदा. आटा, भात, डाळी, खाद्यतेल, साखर इत्यादि दैनंदिन आवश्यक वस्तू त्यांना पुरविण्याची योजना आखावी. आपण मदत करीत असलेल्या मदतीचे स्वरुप सहाय्यक निबंधक / जिल्हा उप निबंधक यांचेशी चर्चा करुन ठरवावा. याविषयी आपण केलेल्या कार्यवाहीबाबत अहवाल पणन संचालक व शासनाकडे सादर करावा.

आपला

अनूप कुमार

(अनूप कुमार)
प्रधान सचिव (पणन)

प्रत --

१]पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे
२]सर्व जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

प्रत अवलोकनार्थ --

१]मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
२]मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव
३]मा.मंत्री {पणन} यांचे खाजगी सचिव.

Scanned by CamScanner